**उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व विद्यापीठाचा प्रशासकीय कामकाजात गुणात्मक प्रगती होण्यासाठी सर्व अकृषि विद्यापीठांच्या कामकाजाचे मुल्यमापन निर्देशक(KPI) करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/(३८३/१०)/विशि-१
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ५ ऑगस्ट, २०११

**प्रस्तावना** : देशाची प्रगती होण्यासाठी तसेच जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी नागरिकांस दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. भविष्यातील सुज्ञ नागरिक घडविण्यामध्ये उच्च शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार राज्यातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू व त्यांचे सर्व अधिकारी यांची असते. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नॅशनल कौन्सिल फॉर टिचर्स एज्युकेशन इत्यादी प्राधिकरणाकडून सुद्धा वेळोवेळी निर्देश देण्यात येतात.

२. तथापि, गेल्या काही वर्षापासून असे निदर्शनास आले आहे की, एका बाजुला जागतिक स्तरावर उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावत असून दुस-या बाजुला राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा मात्र घसरत आहे. याबाबत समाजातील विविध घटक व तज्ञांकडून व तसेच मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखालील कुलगुरूंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) वेळोवेळी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संदर्भात मा. न्यायालयानेही वेगवेगळया याचिकांमध्ये निर्णय देतांना चिंता व्यक्त केली आहे.

३. मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुलगुरूंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) तसेच मा. उच्च न्यायालयाने निरनिराळया याचिकांमध्ये निर्णय देताना उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व शिक्षणाच्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत राज्यातील विद्यार्थी टिकून रहावेत यासाठी सर्व अकृषि विद्यापीठांनी योग्य ती पावले उचलण्यासाठी व त्यांच्या कामकाजाचे प्रभावी मूल्यामापन होणे आवश्यक आहे. तदनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठांना गुणात्मक प्रगतीच्या कामकाजाचे मूल्यमापन (KPI) निश्चित करण्याचे दृष्टीने शासनाला व विद्यापीठांना आदेशित केले आहे.

४. शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षेप्रमाणे वाढ न होण्याची व शिक्षण क्षेत्रामध्ये घसरण होण्याच्या अनेक कारणांपैकी **विद्यापीठाच्या कामकाजाचे योग्य व नियमित मुल्यमापन न होणे हे एक कारण असल्याचे प्रकर्षाने दिसून आले आहे.** तसेच, सन २०१० च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये मा. राज्यपाल महोदयांनी विविध विद्यापीठे व महाविद्यालये यांची गुणवत्ता निर्देशांच्या आधारावर **मुल्यमापन करूनच त्यांना यापुढे अनुदान देण्यात येईल** अशी घोषना केली आहे. त्यामुळे अकृषि विद्यापीठाच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापन होण्यासाठी काही निकष असणे आवश्यक आहे.

५. विद्यापीठाने खुद्द विद्यापीठाचे त्याचप्रमाणे त्यांच्याशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांचे नॅक/एनबीए इ. संस्थेकडून मुल्यमापन करून घेणे, सलग्नित महाविद्यालयामध्ये प्राचार्याची पदे नियमित स्वरूपात भरणे, विद्यापीठातील तसेच विद्यापीठे व संलग्नित सर्व अशासकीय अनुदानीत / विनाअनुदानीत/ कायम

विनाअनुदानीत महाविद्यालयामधील अध्यापकांची रिक्त पदे विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या विनियमनानुसार **अर्हताधारक (Qualified ), मान्यताप्राप्त (Approved ) आणि नियमित (Regular )** स्वरूपाच्या तत्वावर भरणे, विद्यापीठाचे वार्षिक लेखे प्रत्येक वर्षी नियमित स्वरूपात अंतर्गत लेखा परिक्षण करून संबंधीत महालेखापाल यांच्याकडे तपासणीसाठी पाठविणे, संलग्नित महाविद्यालयांना देण्यात येणा-या वेतन व वेतनेतर अनुदानाचे नियमित स्वरूपात मुल्यमापन (Assessment ) करणे, विद्यापीठाने तसेच संलग्नित महाविद्यालयाने संगणक प्रणालीचा वापर पूर्णपणे करणे, इत्यादी स्वरूपाचे कार्य सर्व अकृषि विद्यापीठांची जबाबदारी आहे. त्यामुळे खालील Key Performance Indicator च्या आधारे अकृषि विद्यापीठाच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापन निर्देशक करण्यात यावे.

## शासन निर्णय

प्रस्तावनेतील नमूद सर्व बाबींचा साकल्याने विचार करून सर्व अकृषि विद्यापीठे यांच्या कामकाजाचे मूल्यमापन निर्देशक (KPI) निर्धारीत करण्याचे याव्दारे शासन आदेश देत आहे.

६. **मुल्यमापनाचे निकष**

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **गुण** |
|---|---|---|
| १. | विद्यापीठाने NAAC / NBA इ. संस्थेकडून मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन (Accreditation / Reaccrediation ) करून घेतले आहे किंवा नाही. | असल्यास – ५ गुण<br>नसल्यास – ० गुण |
| २. | विद्यापीठाशी संलग्नित पात्र महाविद्यालयाने NAAC / NBA या प्राधिकरणाकडून मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन (Accreditation / Reaccrediation ) करून घेण्याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे अर्ज सादर केला आहे किंवा नाही. | (i) १००% महाविद्यालयाने अर्ज केला असल्यास – ५ गुण<br>(ii) ७५% महाविद्यालयाने अर्ज केला असल्यास – ३ गुण<br>(iii) ७५% पेक्षा कमी महाविद्यालयाने अर्ज केला असल्यास – ०० गुण |
| ३. | विद्यापीठाशी संलग्नित अनुदानीत / विना अनुदानीत आणि कायम स्वरूपी विना अनुदानात महाविद्यालयातील प्राचार्यांची रिक्त पदे नियमित स्वरूपात भरण्यात आली आहेत किंवा नाही. | (i) १००% पदे भरण्यात आली असल्यास ५ गुण<br>(ii) ७५% पदे भरण्यात आली असल्यास ३ गुण<br>(iii) ७५% पेक्षा कमी पदे भरण्यात आली असल्यास ०० गुण |
| ४. | विद्यापीठातील अध्यापकांची सर्व रिक्त पदे विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या विनियमनानुसार **अर्हताधारक (Qualified ), मान्यताप्राप्त (Approved )** आणि **नियमित (Regular )** स्वरूपाच्या तत्वावर भरण्यात आलेली किंवा नाही. | (i) १००% पदे भरण्यात आली असल्यास ५ गुण<br>(ii) ९०% पदे भरण्यात आली असल्यास ३ गुण<br>(iii) ७५% पेक्षा कमी पदे भरण्यात आली असल्यास ०० गुण |
| ५. | विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानीत / विनाअनुदानीत / कायम विनाअनुदानीत महाविद्यालयातील | (अ) **अनुदानीत /विना अनुदानीत अशासकीय महाविद्यालयामधील** (i) १००% पदे भरण्यात |

| | | |
|---|---|---|
| | अध्यापकाची सर्व रिक्त पदे विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या विनियमनानुसार **अर्हताधारक (Qualified ), मान्यताप्राप्त (Approved )** आणि **नियमित (Regular )** स्वरूपाच्या तत्वावर भरण्यात आलेली किंवा नाही. | आली असल्यास ५ गुण<br>(ii) ९०-९९% पदे भरण्यात आली असल्यास ३ गुण<br>(iii) ९०% पेक्षा कमी पदे भरण्यात आली असल्यास ०० गुण<br>(ब) **कायम विनाअनुदानात महाविद्यालयामधील**<br>(i) १००% पदे भरण्यात आली असल्यास ५ गुण<br>(ii) ७५-९९-% पदे भरण्यात आली असल्यास ३ गुण<br>(iii) ५०-७४-% पदे भरण्यात आली असल्यास २ गुण<br>(iv) ५०% पेक्षा कमी पदे भरण्यात आली असल्यास ०० गुण |
| ६ | विद्यापीठाने आर्थिक वर्ष संपल्यानंतर पुढील सहा महिन्याच्या आत वार्षिक लेख्यांचे अंतर्गत लेखा परिक्षण करून संबंधीत महालेखापालाकडे तपासणीसाठी सादर केले किंवा नाही. | असल्यास – ५ गुण<br>नसल्यास – ० गुण |
| ७ | विद्यापीठास प्राप्त झालेल्या विकास निधीचा विहीत मुदतीत पूर्ण वापर करून तद्संबंधीतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केले आहे किंवा नाही. | असल्यास – ५ गुण<br>नसल्यास – ० गुण |
| ८ | विद्यापीठामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात योतो किंवा नाही. | असल्यास – ५ गुण<br>नसल्यास – ० गुण |
| ९ | संलग्नित महाविद्यालयामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात योतो किंवा नाही. | (i) संगणक प्रणालीचा महाविद्यालयामध्ये १००% वापर होत असल्यास – ५ गुण<br>(ii) ७५-९९-% वापर होत असल्यास – ३ गुण<br>(iii) ७५ -% पेक्षा कमी वापर होत असल्यास – ०० गुण |
| १०. | विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या परिक्षेचे निकाल विहित वेळेत घोषित करण्यात आले किंवा नाही. | असल्यास – ५ गुण<br>नसल्यास – ० गुण |
| ११. | विद्यापीठास व संलग्नित महाविद्यालयाने शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्तरावरून किती पेटंट मिळविले. | प्रत्येक पेटंटसाठी १ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण आणि पेटंट मिळविले नसल्यास ०० गुण |

| | | |
|---|---|---|
| १२. | प्रत्येक शैक्षणिक वर्षात संशोधन मार्गदर्शकांच्या (guide) माध्यमातून विविध विषयातील किती संशोधक वृत्तीधारक (Research Scholar) तयार केले. | (i) कमीत कमी १० संशोधक – ५ गुण<br>(ii) ५ -९ संशोधक असल्यास ३ गुण<br>(iii) ५ पेक्षा कमी संशोधक असल्यास – ०० गुण |
| १३. | आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल (International Peer Journal ) मधून विद्यापीठातील / संलग्नित महाविद्यालयातील संशोधकांनी शैक्षणिक वर्षात किती शोध निबंध प्रकाशित केले. | (i) २५ शोध निबंधासाठी – ५ गुण<br>(ii) १५ ते २४ शोध निबंधासाठी – ३ गुण<br>(iii) १५ पेक्षा कमी असल्यास – ०० गुण |
| १४. | विद्यापीठाकडून आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयावरील परिषदांमध्ये / ऑलीपीयॅाडमध्ये शैक्षणिक वर्षात किती अध्यापकांनी भाग घेतला आहे. | (i) किमान १० अध्यापकांनी सहभाग घेतल्यास – ५ गुण<br>(ii) ५-९ अध्यापकांनी सहभाग घेतल्यास – ३ गुण<br>(iii) ७५ पेक्षा कमी अध्यापकांनी सहभाग घेतल्यास – ०० गुण |
| १५. | विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केलेल्या एकून योजनापैकी किती योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. | (i) १००% योजनांची अंमलबजावणी केली असल्यास – ५ गुण<br>(ii) ७५-९९% योजनांची अंमलबजावणी केली असल्यास – ३ गुण<br>(iii) ७५% पेक्षा कमी योजनांची अंमलबजावणी केली असल्यास – ०० गुण |

| | | |
|---|---|---|
| १६ | विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियमाच्या कलम २ एफ व १२ बी अंतर्गत किती महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अनुदान प्राप्त करतात. | (i) १००% पात्र महाविद्यालये अनुदान प्राप्त करत असल्यास – ५ गुण<br>(ii) ७५-९९% पात्र महाविद्यालये अनुदान प्राप्त करत असल्यास – ३ गुण<br>(iii) ५०-७४% पात्र महाविद्यालये अनुदान प्राप्त करत असल्यास – २ गुण<br>(iv) ५०% पेक्षा कमी, पात्र महाविद्यालये अनुदान प्राप्त करत असल्यास – ० गुण |
| १७. | विद्यापीठ परिक्षत्रातील किती पात्र महाविद्यालयांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केलेल्या एकून य़ोजनापैकी किती योजनांची अंमलबजावणी केली. | (i) सर्व पात्र महाविद्यालयांनी १००% योजनांची अंमलबजावणी केली असल्यास – ५ गुण<br>(ii) ७५-९९% योजनांची अंमलबजावणी केली असल्यास – ३ गुण<br>(iii) ५०-७४% योजनांची अंमलबजावणी केली असल्यास – २ गुण<br>(iv) ५०% पेक्षा कमी, योजनांची अंमलबजावणी केली असल्यास – ० गुण |
| १८. | विद्यापीठाने त्यांचेकडे सुरू असलेल्या एकून अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम विहीत कालानधीत सुधारीत केले ? | (i) संपूर्ण अभ्यासक्रम विहीत कालावधीत सुधारीत केले असल्यास – ५ गुण<br>(ii) नसल्यास -० गुण |
| १९. | विद्यापीठाने शैक्षणिक वर्षात किती विद्यार्थ्यांना पी.एच.डी. पदवी प्रदान केली. | (i) किमान ५० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली असल्यास – ५ गुण<br>(ii) २५-४९ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली असल्यास – ३ गुण<br>(iii) २५ पेक्षा कमी, विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली असल्यास –०० गुण |
| २० | विद्यापीठाकडून चालविण्यात येणा-या एकून अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायाभिमूख आहेत. | (i) किमान ५०% अभ्यासक्रम व्यवसायाभिमूख |

| | | |
|---|---|---|
| | | असल्यास – ५ गुण<br>(ii) २५-४९% अभ्यासक्रम व्यवसायाभिमूख असल्यास – ३ गुण<br>(iii) २५ % पेक्षा कमी, अभ्यासक्रम व्यवसायाभिमूख असल्यास – ००गुण |

**७.** उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजात गुणात्मक प्रगती होण्यासाठी सर्व अकृषि विद्यापीठांच्या कामकाजाचे मुल्यमापन/आढावा वर नमूद केलेले निकष / निर्देशके विचारात घेऊन दरवर्षी करण्यात येईल व त्यांची सांगड विद्यापीठास वितरीत करण्यात येणा-या वेतन अनुदानाशी घालण्यात येईल.

सदर आढावा दरवर्षी घेण्यासाठी **राज्य स्तरावर खालील समिती गठीत करण्यात येत आहे.**

**१)** मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) - अध्यक्ष

२) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) - उपाध्यक्ष

३) सचिव/प्रधान सचिव (उवतंशि) - सदस्य

४) संचालक, तां.शि./उ.शि. - सदस्य

५) उप सचिव/सह सचिव (विशि) - सदस्य सचिव

८. हा शासन निर्णय राज्यातील सर्व उच्च शिक्षण / अभियांत्रिकी / अध्यापकीय / औषधनिर्माणशास्त्र / व्यवस्थापनशास्त्र इ. व्यावसायिक पदवी/ पदवयुत्तर सर्व अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना लागू राहील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८(४), कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम १९९७ मधील कलम ८(४), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ मधील अधिनियम, १९८९ मधील तरतुदी नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharastra.govt.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०११०८०५१५५७३०००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(रा.गो. जाधव)**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

.

**अकृषी विद्यापीठे व संलग्नित**

**महाविद्यालयांचे मुल्यांकन**

**(Accreditation) व पुनर्मुल्यांकन**
**(Reaccreditation) करण्याबाबत**

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३

मंत्रालय, विस्तार, भवन, मुबंई- ४०० ०३२

दिनाकं :- ८ ऑक्टोंबर, २०१०

वाचा : १) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००१ (२१७/०१)/विशि-३, दि.२५ ऑक्टोबर, २००१

२) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००१ (७९/०१)/विशि-३, दि.२ नोव्हेंबर, २००१

३) दि. १५.११.२००८ रोजी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आलेला निर्णय. तसेच दि. २०.३.२००९ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय

४) याचिका क्र. २२१६/२००६ वरील मा. उच्च न्यायालयाचे दि. ३.१२.२००८ चे आदेश

**प्रस्तावना :-** राज्याची प्रगती होण्यासाठी तसेच जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी नागरिकांस दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे. भविष्यातील सुज्ञ नागरिक घडविण्यामध्ये उच्च शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे अत्यावश्यक आहे. या विभागांतर्गत १३ अकृषि विद्यापीठे निरनिराळ्या ४ अधिनियमातील तरतूदी नुसार कार्यरत आहेत. या अधिनियमातील तरतूदी नुसार राज्यातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याची सर्व जबाबदारी विद्यापीठाचे कुलगुरू व त्यांचे सर्व अधिकारी यांची असते. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, इत्यादी प्राधिकरणाकडून सुद्धा वेळोवळी निदेश देण्यात येतात.

२. तथापि , गेल्या काही वर्षापासून असे निदर्शनास आले की, एका बाजुला जागतिक स्तरावर उच्च शिक्षणाचा दर्जा वाढत असून दुस-या बाजुला राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा मात्र घसरत आहे. याबाबत समाजातील विविध घटक व तंज्ञाकडून व तसेच मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखालील कुलगुरूंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) वेळोवेळी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या संदर्भात मा. न्यायालयानेही वेगवेगळया याचिकांमध्ये निर्णय देतांना चिंता व्यक्त केली आहे.

३. मा. कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुलगुरूंच्या संयुक्त बैठकीत (जे.बी.व्ही.सी.) व मा. उच्च न्यायालयाने निरनिराळ्या याचिकांमध्ये निर्णय देताना उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व शिक्षणाच्या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत राज्यातील विद्यार्थी टिकून रहावेत यासाठी योग्य ती पावले उचलण्यासाठी शासनाला व विद्यापीठांना आदेशित केलेले आहे.

४.	शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षेप्रमाणे वाढ न होण्याच्या व शिक्षण क्षेत्रामध्ये घसरण होणा-या अनेक कारणांपैकी **राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून मुल्यांकंन (Accreditation) व पुनर्मुल्यांकन(Reaccreditation) करून न घेणे** हे एक मुख्य कारण असल्याचे प्रकर्षाने दिसून आले आहे. महाराष्ट्र राज्यात सुमारे फक्त २५% शिक्षण संस्थानीच मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन केलेले आहे. उर्वरीत ७५% संस्थानी अद्यापही मुल्यांकनाचे प्रस्ताव संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे पाठविलेले नाही. सध्या मुल्यांकन व पुनर्मुल्याकंन करणे ही बाब बंधनकारक करण्यात येत आहे.

५.	विद्यापीठे व महाविद्यालयांनी मुल्याकंन व पुनर्मुल्यांकन करून घेणे हे आवश्यक असल्याचे धोरण केंद्रशासनामार्फत राबविण्यात येणार आहे. भारतीय संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील समवर्ती सूचीमंध्ये शिक्षण ही विषय समाविष्ट असल्यामुळे या विषयावर आवश्यक ते धोरण ठरविण्याचे अधिकार राज्य शासन व केंद्रशासनास आहेत. **या संदर्भात संपूर्ण देशातील उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे या करीता विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांनी नॅशनल ॲसेसमेंट व ॲक्रीडीटेशन कॉन्सील बॅंगलोर कडून डिसेंबर, २००३ अखेरपर्यन्त ॲसेसमेंट व ॲक्रीडीटींशेन करून घेण्याचे निदेश दिलेले आहेत. तसेच जी महाविद्यालये डिसेबर, २००३ पर्यन्त नॅककडे मुल्यांकन व प्रमाणिकरणाकरीता अर्ज करणार नाहीत किंवा या प्रक्रियेत सहभागी होणार नाहीत अशा महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत विकासात्मक अनुदान दिले जाणार नसल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. राज्यशासनाकडून सन २००१ पासून विना अनुदानीत / कायम विनाअनुदानीत तत्वावर राज्यातील खाजगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून विविध शाखेमध्ये प्रसार होण्यासाठी महविद्यालयांना मंजूरी देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यामुळे अशा शैक्षणिक संस्थाना व खाजगी महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे विकासात्मक अनुदान मिळण्याच्या दृष्टीने राज्यशासनाने मुल्यांकन व प्रमाणिकरण करण्याच्या दृष्टीने सर्व महाविद्यालयांना मार्गदर्शन व्हावे याकरीता विशेष पुढाकार घेऊन तत्कालीन मंत्री (उ.व तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन केली होती. या व्यतिरिक्त डॉ.जनार्दन वाघमारे, माजी कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली मुल्यांकन व प्रमाणिकरणाच्या कामात नियंत्रन/ देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने एक विशेष कार्यगट स्थापन करण्यात आला होता. त्यामुळे राज्यातील ५ वर्षाहून अधिक काळ कार्यरत असणा-या महविद्यालयांनी मुल्यांकन व प्रमाणिकरणाच्या प्रक्रि येत सहभागी व्हावे असे निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी राज्यात विद्यापीठनिहाय विभागीय समित्यांची स्थापना सुद्धा करण्यात आली होती.**

६.	मा. राज्यपाल महोदयांनी दि.११.११.२००९ रोजी विधानमंडळामध्ये केलेल्या अभिभाषणात विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांनी मुल्यांकन (Accreditation) व पुनर्मुल्यांकन(Reaccreditation) करणे बंधनकारक राहील असे घोषित केले आहे.

७.	वरील उणीवा दूर करण्यासाठी व मा. उच्च न्यायालयाच्या आदेश, केंद्रशासनाचे धोरण व मा. राज्यपाल महोदयांची घोषणा, इत्यादीची अंमलबजावणी करण्यासाठी शासन पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>शासन निर्णय</u>

**८. आता सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित सर्व पात्र महाविद्यालयांना मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करणे अनिवार्य असून त्याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत-**

(i) ज्या अकृषि विद्यापीठांनी व त्यांच्या अधिक्षेत्रातील सन २००१ पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या सर्व संलग्नित पात्र महाविद्यालयांनी तसेच विना अनुदानीत महाविद्यालयांनी ५ वर्षाहून अधिक काळापर्यंत कार्यरत असणा-या महाविद्यालयांनी / संस्थांनी मुल्याकंन व पुनर्मुल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित होते. तथापि **ज्या शैक्षणिक संस्थानी/ महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत मुल्यांकन वा पुनर्मुल्यांकन करून घेतलेले नाही त्यांनी खालीलप्रमाणे निश्चित केलेल्या तीन टप्प्यांचा (Three Stage ) अवलबं करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.**

(अ) शासनाच्या नविन धोरणानुसार दि.३१ मार्च,२००१ पूर्वी विविध खाजगी शैक्षणिक संस्थाना बहुशाखीय महाविद्यालये अनुदान तत्वावर मंजूर करण्यात आली आहेत अशा महाविद्यालयांनी / संस्थानी संबंधीत प्राधिकरणाकडून उदा. N A AC, N B A मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करून घेणे व त्यामध्ये अपेक्षित वर्गवारी प्राप्त करून घेणे या आदेशान्वये **अनिवार्य करण्यात येत आहे.** तव्दतच ज्या खाजगी शैक्षणिक संस्थांना दि. ३१ मार्च, २००१ नंतर अनुदानीत / विनाअनुदानीत व कायम विना अनुदानीत तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या विविध शाखीय महाविद्यालयांचे / संस्थांचे मुल्यांकन अद्यापपर्यन्त केले नसल्यास अशा संस्थांनी सुद्धा १०० टक्के महाविद्यालयाचे / संस्थांचे मुल्यांकन (Accreditation) क रून घेणे आवश्यक आहे. तव्दतच ज्या महाविद्यालयानी / संस्थानी मुल्यांकन करून घेतले असल्यास, त्यानी पुनर्मुल्यांकन (Reaccreditation) करून घेणे आवश्यक आहे.

(ब) ज्या खाजगी शिक्षण शंस्थाना १ एप्रिल, २००१ नंतर मंजूर करण्यात आलेल्या विनाअनुदानीत व कायम विना अनुदानीत तत्वावरील ५० टक्के एवढी महाविद्यालये / संस्थांचे मुल्यांकन दि. ३१ मार्च, २००७ पर्यन्त करून घेणे आवश्यक होते. तथापि, अशा मंजूर झालेल्या महाविद्यालये / संस्थाचे मुल्यांकन (Accreditation) / पुनर्मुल्यांकन (Reaccreditation) करून घेण्यात आले नसल्यास त्यासंस्थांनी त्यांचे प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे आद्याप पर्यान्त पाठविले नसतील तर त्यांचे प्रस्ताव दि. ३० नोव्हेंबर, २०१० पर्यन्त पाठविण्याची व्यवस्था करावी.

(क) ज्या खाजगी शिक्षण संस्थांना दि. १ एप्रिल, २००७ नंतर मंजूर करण्यात आलेल्या विना अनुदानीत व कायम विना अनुदानीत तत्वावरील महाविद्यालये / संस्था यांचे मुल्यांकन (Accreditation) पूर्ण करण्याच्या दृष्टीने दखल घेऊन त्याप्रमाणे विहीत मुदतीत दि. ३१ मार्च, २०११ पर्यन्त आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

(i) सर्व पात्र अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्था यांनी मुल्यांकन व पुनर्मुल्यांकनाचे प्रस्ताव जर अद्यापपर्यन्त संबंधित प्राधिकरणाकडे पाठविले नसतील तर त्यांनी त्यांचे प्रस्ताव **दि.३० नोव्हेंबर, २०१० पर्यंन्त** संबंधित प्राधिकरणाकडे पाठवावेत.

**(ii)** सन २००८-०९ व २००९-२०१० व त्यापुढील शैक्षणिक वर्षानंतर पात्र ठरणा-या विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांनी / संस्थांनी त्यांचे मुल्यांकन व पुनर्मुल्यांकनाचे प्रस्ताव ते ज्या वर्षी पात्र

ठरतील त्यानी त्या शैक्षणिक वर्षातील **दि.३१ मार्च** अखेर पर्यन्त संबंधित प्राधिकरणाकडे पाठविणे बंधनकारक राहील.

६. **विद्यापीठांची जबाबदारी –**

(i) सर्व पात्र अनुदानीत / विना अनुदानीत व कायम विनाअनुदानीत महाविद्यालये / संस्थांचे मुल्यांकन (Accreditation) व पुनर्मुल्यांकन (Reaccreditation) प्रस्ताव वरील परिछेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकरणांकडे विहीत मुदतीत सादर करण्यांत येतील व हे तपासण्यांची सर्व जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ii) विद्यापीठाने वरील बाबींचा तिमाही (Quarterly) आढावा घेऊन तद्संबंधीचा अहवाल त्याच **महिण्याच्या दि. १५ तारखेपर्यन्त** संबंधीत विभागीय सहसंचालक व संचालक (उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण) यांच्याकडे सादर करावा.

(iii) जी महाविद्यालये / संस्था अशाप्रकारचा मुल्यांकनाचा / पुनर्मुल्यांकनाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे विहीत मुदतीत पाठविणार नाही अशा **महाविद्यालयाच्या विरूध्द संबंधित विद्यापीठाने असंलग्निकरण, इ.बाबत** कारवाई करावी.

७. **संचालक / सहसंचालक यांची जबाबदारी :**

(i) विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालय / संस्थाकडून सदर शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण त्याचप्रमाणे संचालक, उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण यांनी **योग्य तो पाठपुरावा** करून **त्रैमासिक अहवाल** शासनास सादर करावा.

(ii) सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यास जी विद्यापीठे / महाविद्यालये व संस्था अपयशी ठरतील, त्या विद्यापीठाविरूध्द शासन योग्य ती कारवाई करेल.

८. हा शासन निर्णय राज्यातील सर्व उच्च शिक्षण / अभियांत्रिकी / अध्यापकीय / औषधनिर्माणशास्त्र / व्यवस्थापनशास्त्र इ. व्यावसायिक पदवी/ पदवयुत्तर सर्व अभ्यासक्र माच्या महाविद्यालयांना लागू राहील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८(४), कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम १९९७ मधील कलम ८(४), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ मधील अधिनियम, १९८९ मधील तरतुदी नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharastra.govt.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्र मांक २०१०१००८१९०५२३००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(रा,गो. जाधव)

शासनाचे उपसचिव